# नियमीत दिवाणी दावा नं.११०/२०१९ मधील नि. २४ खालील आदेश
## (तानाजी बुरूंगले इ. वि. गणेश बुरूंगले इ.)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जात प्रतिवादींचे कथन की, सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादी यांना वाद मिळकतीसंबंधीचे आवश्यक असणारी जुनी कागदपत्रे मुदतीत मिळालेली नाहीत. तसेच कोरोना रोगाचा प्रादुर्भावामुळे प्रतिवादी क्र. १ यांना हजर राहून दाव्यास कैफियत देणे अशक्य झाले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांचे विरुध्द विनाकैफियतीचा हुकूम झालेला आहे. सदरचा दावा हा स्थावर मिळकतीचा असलेमुळे या दाव्याचा गुणानुरूप न्यायनिर्णय होणेचे दृष्टीने प्रतिवादी क्र. १ यांचेविरुध्द झालेला विना कैफियतीचा हुकूम रद्द करुन कैफियत व म्हणणे स्वीकारणेत यावी अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जाखाली आपले म्हणणे दिले की, सदरचा अर्ज खोटा व लबाडीचा असून त्यामध्ये सत्याचा लवलेशही दिसून येत नाही. सदर प्रतिवादीने जाणून-बुजून यात विलंब केला असून न्यायप्रक्रियेस अडथळा केला आहे. तरी सदर अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी यांचा अर्ज वाचला. वादींचे म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. यावरुन असे दिसते की, वादीने प्रस्तुत दावा सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. अभिलेखांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी हे दाव्याकामी दि.१९.०३.२०२१ रोजी हजर झाल्याचे दिसून येते. परंतू त्यांनी मुदतीमध्ये कैफियत दिलेली नाही. सदर दाव्याचा वाद विषय हा वाटपाचा असल्यामुळे तसेच स्थावर मिळकतीबाबत असल्याने प्रतिवादी यांना त्यांची कैफियत अभिलेख सदरी दाखल करणे गरजेचे आहे. त्यास परवानगी

दिल्यास दावा गुणदोषावर चालण्यास मदत होईल. तसेच मौल्यवान हक्क व हितसंबंध दावा मिळकतीमध्ये गुंतलेले असल्याने प्रतिवादी यांना त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करण्यास परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल. त्यांनी आपल्या अर्जाचे पुष्टयर्थ नि. २५ खाली शपथपत्र दाखल केले आहे. नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नि.२४ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांचे विरुध्द पारीत झालेला विना कैफियत व म्हणणेचा आदेश रद्द करणेत येतो.

( **के. बी. सोनवणे** )

दि. २७/१०/२०२३.

दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgement/order :-

| | | | |
|---|---|---|---|
| **(a)** | Name of the Stenographer | **:-** | A.S.Yadav |
| **(b)** | Court | **:-** | 2nd Jt. Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Sangola. |
| **(c)** | Judgment/Order signed by PO on | **:-** | 27/10/2023. |
| **(d)** | Judgment/Order uploaded on | **:-** | 27/10/2023. |